उमापुर, ता. गेवराई, जि. बीड येथे नविन ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः श्रेणीवर्धन-२०१८/ प्र.क्र.२२१/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीखः ४ जून, २०१९.

वाचा

सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्र.संआसे / राज्यस्तर / टे-२/कक्ष-३/उमापुर, ता. गेवराई, जि. बीड, ग्रा. रु. स्थापन/जा.क्र.३६११-१२/१८, दि.१२.०४.२०१८.

प्रस्तावना

उमापुर, ता.गेवराई, जि.बीड येथे नविन ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याबाबतचा आरोग्य सेवा संचालनालयाचा उपरोक्त प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय

उमापुर, ता. गेवराई, जि. बीड येथे "विशेष बाब" म्हणून नविन ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर रुग्णालयासाठी उपलब्ध असलेल्या जागेवर इमारतीचे बांधकाम करण्यासाठी अंदाज आराखडे तयार करुन प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत. तसेच बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०४१०५९४३३५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.06.04 15:47:08 +05'30'

(प्र. मो. बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

२. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर.
७. सहाय्यक संचालक (लेखा व प्रशासन), आरोग्य सेवा, मुंबई.
८. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय, लातूर.
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर.
११. वित्त विभाग (विनियम कार्यासन) / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य-४), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.